# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | पोलीस ठाणे | गु र न कलम | गु घ ता वेळ ठिकाण | गु दा ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अ ता वेळ | गेलेला माल | मिळा ला माल | घ/भेट देणारे आधी | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुंडलिक नगर | 375/19 कलम 324,323, 504,506, 34 भादवी | 14/9/2019 रोजी 00.00 ते 00.30 वा. सु. औरंगाबाद | .14/09/ 19 रोजी 05.42 वा. | सतिष रविद्र पाटील वय 24 वर्ष धंदा मजुरी रा. औरंगाबाद | 1) ऋषीकेश तनपुरे 2) आरोपी महिला रा. औरंगाबाद | | पोउपनि श्री खटके | | | पोह/ 1653 कावरे मो.9 5523 4666 6 | नमुद ता. वे.ठिकाणी यातील आरोपीतानी दोघानी संगणमत करुन फि.,स शिविगाळकरुन हाताचापटाने मारहाण केली वचाकुने मारुन जखमी केले व परत जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल |
| 2 | पुंडलिक नगर | 376/19 कलम 406 ,420,34 भादवी | 08/03/19 रोजी ते 31/07/19 चे 10.00 वा ते 00.00 वा औबाद | 14/09/2 019 रोजी 17.26 वा | फिर्यादी महिला वय 30 वर्षे नोकरी राहणार मोबाईल | 1) आरोपी महिला 2) विश्वभंर गांवडे रा. औबाद | | 170,000. 00 | | पो उप नि मुळे | मपोउ पनि फसाटे मो.नं. 7020 7096 50 | नमुद ता वेळी व ठि. यातील फि, स आरोपीतांनी संगनमत करुन दि. 08/03/19 पासुन ते 31/07/19 पावेतो यानी दोघाना मिळुन संगनमत करुन सावित्री बाई फुले महीला बचत गट परभणी या मार्फत बाजारभावापेक्षा कमी भावाने बुलेट, फ्रीज, पीठाचा गिरणी देण्याची आमिष दाखवुन फि, व फि, चे पतीचा विश्वास संपादन करुन फि. चे पतीचे खात्यातुन सुरेखा म्हेत्रे यांच्या बॅंक खात्यात 1 लाख 70,000 रु ची विश्वास घात करुन फसवणुक केली आहे. म्हणुन गुन्हा |
| 3 | पुंडलिक नगर | 377/19 कलम 392, 323,504 भादवी | 13/09/201 9 रोजी 10.00 ते 10.15 वाजेच्या सुमारास जय भवानी नगर केशरीया कापडाच्या दुकानासमोर | 14/09/2 019 रोजी 18.49 वा. | सचिन मच्छीन्द्रं गायकवाड वय 22 वर्षे धंदा शिक्षक रा. जयभवानीनगर 13 वी योजना सिडको घर नं. 103 औरंगाबाद | अनोळखी एक इसम | | 24,253 रु किमतीची गळयातील सोन्याची चैन | | पो उप नि मुळे | पोउप नि मुळे मो.नं. 9922 4461 98 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी दि. 13/09/2019 रोजी रात्री 10.00 ते 10.15 वाजे दरम्यान जयभवानी नगर चौक येथील केशरीया कापडाचे दुकाना समोर फिर्यादी उभा असतांना एका अनोळखी इसमाने काही एक कारण नसतांना फिर्यादीस हाताचापटाने मारहान करुन शिवागाळ करुन फिर्यादीच्या गळयातील सोन्याची चैन हिसकावुन व अंधाराचा फायदा घेवुन सदर अनोळखी इसम पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | ज. नगर | 296/19 कलम324, 323,504 506,427 34 भादवी | 13/9/19 रोजी 18.15 वा. इंदिरानगर औरंगाबाद | 14/09/19 रोजी 00.20 वाजता | अजय आसाराम सोनवणे वय 18 वर्ष धंदा मजुरी रा. इंदिरानगर गल्ली नंबर 1 नालंदा बौध्द विहार जवळ औरंगाबाद | 1) कैलास गायकवाड 2) उत्तम गायक वाड 3) विजय दाभाडे 4) कांतीलाल गायकवाड सर्व रा. काबरानगर औरंगाबाद | - - | -- | -- | | पोना. 985 वानखेडे मोन. 9823100085 | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चे व आरोपीचे सिग्नलवर गाडीचा धक्का लागल्याच्या कारणा वरुन घरासमोर इंदिरानगर येथे घरी येवुन आरोपी क्र.1 याने शिवीगाळ करुन फायबरचे दांड्याने मारहाण केल्याने डाव्या पायाला मांडीवर मार लागुन वळ उमटले आहे व पोलीसात तक्रार केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली व तीघांनी शिवीगाळ करुन हाताचापटाने मारहाण करुन घराचा दरवाजा तोडुन नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल |
| 5 | ज. नगर | 297/2019 कलम 324 323,504, 34 भादवि | 10/09/2019 चे 19.00 ते 13/09/]19 चे 18.30 वा हिरा पान सेंटर सहकार नगर चौक अमृत बाल रुग्णालय | 14/9/19 रोजी 15.50 वाजता | अवधुत प्रभाकर माने वय-28 वर्ष व्यवसाय पानटपरी रा. प्लॉट नं76 म्हाडा कॉलनी , ज्योतीनगर , औरंगाबाद | विरोधक- क्र. 1 दिपक सोनवणे रा. फुलेनगर व सोबत तिन अनोळखी तिन इसम पुर्ण नाव पत्ता माहित नाही | | | | | स.फौ. ई.एम. चव्हाण | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादि यांना विरोधक यांनी उधारीवर माल मागितला असता यातील फिर्यादि यांनी विरोधक यांना उधारीवर माल देण्यास नकार दिल्याचे कारणावरुन यातील विरोधक यांनी संगनमत करुन फिर्यादिस शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने मारुन जखमी केले व फिर्यादि यांचा मित्र विरोधक याची समजुत घालत असतांना विरोधक यांनी फिर्यादि व त्यांचे मित्राला खाली पाडुन चापट बुक्क्याने मारुन जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल. |
| 6 | ज. नगर | 298/2019 कलम 324 323,504 34,भादवि | 14/9/2019 रोजी दुपारी 02.45 वा. सुमारास शिवनगर गादिया विहार प्लॉट नं 15 औरंगाबाद | 14/9/19 रोजी 19.04 वाजता | विजयकुमार शिवप्रसाद कुमार वय-42 वर्ष, धंदा-ए.सी. रिपेअर मेकॅनिक रा. प्लॉट नं 15 अपार्टमेंन्टमध्ये फ्लॅट नं 08 | 1)भगवान धनेश्वर क्र 2) जया भगवान धनेश्वर क्र. 3) रंजना वाटके सर्व रा. आमच्या बिल्डींग मध्येशिवनगर औरंगाबाद 4) जयाचा | - - | | | | पोह/548 कायटे मोन. 9960315575 | नमुद ता. वेळी व ठिकाणी झालेल्या किरकोळ भांडणाचे कारणावरुन दि.-14/09/2019 रोजी दुपारी 02.45 वा. शिवीगाळ मारहाण करुन फिर्यादी यांना जिन्यावर लोटुन दिल्यामुळे फिर्यादीचे डोके फुटून जखमी करणारे भगवान धनेश्वर क्र 2 जया भगवान धनेश्वर क्र. 3रंजना वाटके सर्व रा. आमच्या बिल्डींगमध्ये शिवनगर औरंगाबाद क्र4 जयाचा भाऊ नाव व पत्ता माहित नाही यांनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन जखमी केले .वगैर |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिवनगर गादियाविहार औरंगाबाद | भाऊ नाव व पत्ता माहित नाही | | | | | | मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल |
| 7 | सिडको | 543/19 कलम 379 भा.द.वि | 13/9/209 रोजी वेळ दुपारी 14.30 ते 16.30 वा. द.एम.जी.एम कॉलेज,गेट नं. 5,च्या बाजुला सिडको, औरंगाबाद | 14/9/19 रोजी 12.50 वाजता . | अमोल गंगाधर राजाळे वय 32 वर्षधंदाघरगुती क्लासेस, रा.H-7/3,नवनाथ नगर,हडको, औरंगाबाद , | अज्ञात | | गेलामाल- 15,000/-रु किं.जु.वा. किं.अं.हिरो कंपनीची सी.डी.डील क्स मो. सा. क्र.MH-20-CL-7967 | | | पोह/ 2565 राठोड | नमुद.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी वापरत असलेली त्यांचे पुतन्या नामे शुभम राजाळे यांचे नावावर असलेली मो.सा क्र. MH-20-CL-7967 हीचेवर बसुन त्यांचे कामानिमित्त एम.जी.एम कॉलेज येथे आलो असता फिर्यादीने त्यांची मो.सा.ही एम.जी.एम कॉलेज गेट नं. 5 च्या बाजूला सिडको, औरंगाबाद येथे हॅन्डललॉक करुन उभी केली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी चोरुन नेली म्हणुन गुन्हा दाखल . |
| 8 | सिडको | 544/19 कलम 452 323,504, 506,34 IPC. | 14/9/2019 रोजी 16.30 वा. सुमारास औरंगाबाद | 14/09/19 चे 23.30 वाजता | फिर्यादी महिला वय 40 वर्ष धंदा घरकाम रा. औरंगाबाद | 1) दिपक सर्जेराव पाटील 2) आरोपी महिला 3) आरोपी महिला 4)दिपक पाटील यांचा एकनाते वाईक नाव माहित नाही सर्व रा., औरंगाबाद | निरंक | | | | पोह/ 612 ढगे | यातील फिर्यादी हे आरोपीतांचे भाडेकरु असुन वरील ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करुन विनापरवाना अनधिकृतपणे फिर्यादी राहत असलेल्या घरात प्रवेश करुन ,"तुम्ही घर खाली का करीत नाही?" असे म्हणुन वाद घालुन फिर्यादीस व तीच्या पतीस शिविगाळ करुन झटापट करुन फिर्यादीस हाताचापटाने मारहाण केली तसेच घर खाली न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | मुकुंद वाडी | 338/19 -कलम 380, 454 भादवि | 11/09/19 रोजी11.30 ते11/09/19 रोजी 13.30 प्लाट नं- 32 साईअपार्टमेंट N-2 डॉ. पोहेकर यांच्या समोर मुकुंदवाडी | 14/09/19 रोजी 16.01 वाजता | नरेंद्र नारायण पाटीलवय- 47 वर्षे रा- प्लाट नं- 02 प्लाट नं- 32 साई अपार्टमेंट N-2 डॉ. पोहेकर यांच्या समोर मुकुंदवाडी औ,बाद | अज्ञात | - - | 1) सोन्याचे गंठण पाच तोळेवजणाचे2)सोन्याचे झुंबरपाच तोळेवजणाचे 3)चांदिचे ताटवतांब्या .असे एकुण 77000/- रु. कि,चामाल. | -- | | सफौ गोरे | नमुद.ता.वेळी व ठिकाणी दि- यातील 11/09/2019 रोजी 11.30 वा. फिर्यादी व माझी पत्नी दोघेही घराला कुलुप लावुन कामाला गेलो. मी दुपारी एक वाजता घरी आलो असता, मला माझ्या घराचा कडी कोंडा तुटलेला दिसला. मी घरात गेलो व घरातील कपाटाचा दरवाजा उघडा दिसला. कपाटातील ड्रावरमध्ये ठेवलेले नमुद वर्णनाचे सोन्याचे व चांदिचे दागिणे कोणीतरी अज्ञात चोराने घराचा कडी कोंडा तोडुन लबाडीच्या ईराद्याने चोरुन नेले आहे. म्हणुन गुन्हा दाखल |
| 10 | हर्सुल | 212/19 कलम 379 भादवी | 09/09/2019 रोजी 09.00 ते 09.30 वा. द.नेट कॅफे एस.बी.ओ. चौक समोर मयुरपार्क | 14/09/2019 रोजी 15.45 वाजता . | झुंबर बाजीरवा जुंजे वय50 वर्ष धंदा सलुन काम रा.मारोतीनगर मयुरपार्क प्लॉट नं10 हर्सुल | अज्ञात | | 12000/रु की.हीरो कंपनीची फॅशनप्रो मो. सा.क्र. MH-20,DN - 4012 | | | पोह/616 राठोड मो नं 9923793677 | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मुलगा हा फिर्यादीची मो.सा.घेवुन त्याच्या मित्रास भेटण्या साठी गेला व मो.सा.नेट कॅफे समोर उभी करुन मित्रास भेण्यासाठी आत गेला व मित्रास भेटुन आरध्या तासानी परत बाहेर येवुन गाडी पाहीली असता उभी केलेल्या ठिकाणी मोसा दिसुन आली नाही ती कोणी तरी अज्ञात चोरट्याने लबाडीच्या ईऱ्यादयाने चोरुन नेली आहे म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | दौलताबाद | 106/2019 कलम 283 भा.द.वी प्रमाणे | 14/09/2019 रोजी 13.45 वा.सु. दौलताबाद खुलताबाद जाणाऱ्या रोडवर किल्या समोर | 14/09/19 रोजी 14.40 वाजता . | शेषराव बाबुराव काळे स.फौ/4088 ने. पो.स्टे दौलताबाद औरंगाबाद शहर | LPG रिक्षा क्र MH 20 EF 8748 समीर अमिर तांबोळी वय 23 वर्षे धंदा रिक्षाचालक रा. मिटमिटा | | | | | ASI पवार | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपीने आपल्या ताब्यातील LPG रिक्षा क्र MH 20 EF 8748 ही अशा रितीने उभी केली की येणाऱ्य जाणाऱ्या रहदारीस अडथळा निर्माण होवुन ईजा व अटकाव होईल अशा रितीने उभी असताना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल. |
| 12 | सिटी चौक | 319/19 कलम 452, 354 (A), 504, 506, 34 भादवी | 13/09/19 चे 09.00 वा औरंगाबाद | 14/09/19 चे 16.20 वाजता दाखल | फिर्यादी महिला वय 35 वर्ष रा. औरंगाबाद | 1) इद्रीस खाजा कुरेशी रा. औरंगाबाद, 2) इकबाल खाजा कुरेशी रा. सदर | – | --- | | | पोह/628 लईक मो.नं. 9923256786 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही तिच्या घरात असतांना आरोपींनी संगनमत करुन बळजबरीने फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादीस म्हणाले की तुम हमारे बांधकाम में आड क्यों आरे असे म्हणुन आरोपी क्र. 1 याने वाईट हेतुने फिर्यादीचा हात धरुन जवळ ओढुन तिची छाती दाबली व आरोपी क्र. 2 याने फिर्यादीचे पाठीमागुन येवुन वाईट हेतुने तिच्या जवळ येवुन अंगलट करुन तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले व तिचा विनयभंग केला व तिला म्हणाले की, तुम बांधकाम में आड आगये तो हम तुमको नही छोडेंगे, यहाँ तुमको रहेने नही देंगे अशी धमकी देवुन शिवीगाळ केली व तुम्हास पाहुन घेईन असे म्हणुन फिर्यादीचे पतीस जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | एम सिडको | 344/2019 कलम 379 भादवी | 05/09/2019 चे 02.00ते 18.00वाजे औरंगाबाद | 14/09/2019 रोजी वेळ – 18.21 वाजता | कृष्णा दिनकर आगळे वय 21वर्षे धंदा-खा.नोकरी,रा. जयभवानीनगर ,औरंगाबाद | अज्ञात | - - - - - | 1)15,000 जु.वा.किं.अं मो.सा क्र MH 20 DS 3775 हिरो कंपणीची | | | पोना /1055 आर. पी.शेजुळ मो.नं-9923464669 | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने तो वापरत असलेली त्याच्या मित्राची मो.सा क्र MH 20 DS 3775 हिरो कंपणीची हि एन-1 सिडको येथे छोटू वडा ऑफिस समोरून उभी करून ऑफिस मध्ये गेला असता दि 05/09/2019 चे दुपारी 02.00ते संध्याकाळी 06.00वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वताच्या फायद्यासाठी लाबाडीच्या इराद्याने चोरून नेली आहे.म्हणुन गुन्हा दाखल. |
| 14 | वेदांत नगर | 186/19 कलम 188 भादवि | 14/09/2019 रोजी 16.35 वा फ्लॅट नं बी-301 सिग्नेचर अपार्टमेंट बन्सीलालनगर औरंगाबाद | 14/09/2019 रोजी 19.43वा .सू | मोतीलाल हिरालाल गायकवाड/184 वय-51 वर्षे नेमणुक पो.स्टे. वेदांतनगर औरंगाबाद (शहर) | योगेश किशनराव कोटगीरे वय-44वर्षे,रा-फ्लॅट नं बी-301 सिग्नेचरअपार्टमेंट बन्सीलाल नगर औ,बाद | निरंक | | | | पोहेका/2247 जाधव | -नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीताने घर भाडेकरु बाबतची माहिती ही पो.स्टे.वेदांत नगर येथे देणे बंधनकारक असल्याचे माहीत असुन सुद्धा ती माहिती न दिल्याने CRPC 1973 चे कलम 144 (1)(3)मा.पोलीस आयुक्त औरंगाबाद (शहर) यांचे आदेश जा.क्र. विशी-5/आदेश/ औरंगाबाद/2019-3618 पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद दि.21/08/2019 अन्वये च्या आदेशाचे उल्लंघन केले |
| 15 | क्रांती चौक | 302/2019 कलम 326,324,504,34 भादवि | 13/09/2019 रोजी 20.30 वा.सुमारास गरमपानी रोडवरील बिर्याणीच्या गाडी जवळ, औरंगाबाद | 14/09/2019 रोजी 23.05 वा | शेख चाँद शेख नाईद वय25 वर्ष रा. आसेफिया काँलनी औरंगाबाद | 1) जावेद 2) इशु 3) मेहराज 4) शाहरुख | | | | | परिपोउपनि संदीप शिंदे | नमुद तारीख.वेळी.व.ठिकाणी यातील फिर्यादी हे गरमपानी रोडवरील बिर्याणीचे गाडीवरील बिर्याणी खावुन जात असतांना बाजुच्या टिकीया पावचे गाडीवरील आरोपी क्र 1यांने शिवीगाळ केली यावरुन फिर्यादी व आरोपी यांचेत हुज्जत झाल्याने आरोपी क्रं एक याने तीन आरोपीस रिक्षात बोलावुन फिर्यादीस पायावर, पाठीवर, डोक्यात लाथ्या काठ्या मारुन जख्मी करुन दोन्ही पाय फँक्चर केले. वगैरे मजकुराचे जबाबा वरुन मा.पोनि सो यांचे आदेशाने गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय शहर येथील दि १५/०९/२०१९ चे गुन्हे आढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | बेगम पुरा | 195/2019 कलम 324.504.506.290 भा.द.वि | 13/09/2019 रोजी 23.40 वा.सुमारास बिस्मील्लाह कॉंलनी औरंगाबाद. | 14/09/2019 रोजी 03.42 वा.सुमारास | शेख नवीद शेख रफीक वय 23 वर्ष धंदा.मजुरी रा.हीलाल कॉंलनी ,बसरा मस्जिद जवळ औरंगाबाद . | हैदर शेख पुर्ण नाव माहीत नाही रा. जहागीर भाई ची बेकरी शेजारी ,हीलाल कॉंलनी औरंगाबाद | | | | | पोह/356 उगले | नमुद ता वेळी व ठीकाणी यातील आरोपीने फिर्यादीस जुन्या भांडणाच्या कारणावरुन त्याच्या हातातील धारदार चाकुने फिर्यादीच्या कानावर वार करुन जखमी करुन शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली वगैरे मचकुरावरुन मा.पोनिसो यांचे आदेशाने गुन्हा दाखल. |
| 17 | एम-वाळुज | 631/2019 कलम 122 मु पो का . | 14/09/2019 रोजीचे 00.50 वाजेच्या सुमारास | 14/09/2019 रोजी 1.33 | बंडु विश्वनाथ गोरे, वय-32 वर्षे, पोलीस शिपाई/2823, नेमणुक पो. स्टे. MIDC वाळूज औरंगाबाद शहर. | अतुल बदाम राव तवार वय 36 वर्ष रा. कडेठाण ता. पैठण जि. औरंगाबाद | | | | | पोह 287 भागडे मो 9823226287 | नमुद ता. वेळ व ठिकाणी यातील आरोपी नामे अतुल बदामराव तवार वय 36 वर्ष रा. कडेठाण ता. पैठण जि. औरंगाबाद हा मोहटा देवी मंदिराचे पडसावलीत आडोशाला आंधारात आपले अस्तीत्व लपवुन काहीतरी मालाविरुध्दचा दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने सुर्यास्त ते सुर्योदयाच्या दरम्यान संशयास्पदरित्या मिळुन आला आहे. म्हणन गुन्हा |

SD/-

पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर

करीता.